☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट /224/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 05/06/2025

# 1)घरफोडी :–

**1)विमानतळ :–** दिनांक 04.06.2025 रोजी 01.15 वा. ते 04.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी शिवनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घरी कोणी नसताना घराचे गेटवरून आत उडी मारून घरात प्रवेश करून घराचे दरवाजाचे व कपाटाचे कुलूप कश्यानेतरी तोडून कपाटात ठेवलेले नगदी व सोन्या चांदीचे दागीने असा एकुण किंमत 4,28,650/– रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सय्यद बिलाल सय्यद बशीर, वय 31 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. शिवनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे विमानतळ गुरनं 218/2025** कलम 331(4),305 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री साने, मो. नं. 7249047323** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 03.06.2025 रोजी 11.00 वा. ते दिनांक 04.06.2025 रोजी 09.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी गोविंदनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांची पत्नी माहेरी गेल्याने तीस भेटण्यासाठी गेले असता घरी कोणी नसताना घराचे गेटचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घराचे बैठक रूमचे कुलूप तोडुन कपाटातील एक पाण्याची मोटार, नगदी रूपये व सोन्याचे दागीने असा एकुण किंमत 1,53,500/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी देवीदास भगवान जाधव, वय 40 वर्षे, व्यवसाय सरकारी नौकरी रा. गोविंदनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे विमानतळ गुरनं 219/2025** कलम 331(4),331(4),305 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री साखरे, मो. नं. 9096621263** हे करीत आहेत.

# 2)जबरी चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 03.06.2025 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे प्लॉट समोर काकांडी ता. जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. संतोष जिवन देशमुख 2. ओमकार संतोष देशमुख दोघे रा. काकांडी ता. जि. नांदेड यांनी फिर्यादीचे बहिणीच्या मुलास प्लाटवर खेळण्याचे कारणावरून मारहाण करीत असताना फिर्यादीने आरोपीतांना तुम्ही लहान लेकराला का मारहाण करता तसेच आमच्या येणे जाणे करण्याच्या रस्त्यावर दगड रचून रस्ता का आडवता असे म्हणाला असता फिर्यादीस आरोपीतांनी संगणमत करून रोडवर पाडून लाथबुक्यांनी मारहाण करून कमरेत दगड मारून दुखापत केली व व्हीओ कंपनीचा मोबाईल किंमत 10,000/–रूपयाचा हिसकावून घेवून गेले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी प्रल्हाद दिगांबर देशमुख, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. काकांडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 532/2025 कलम 119(1),118(1),126(2),115(2),352,351(2),351(3),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.नं. 9823827173** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 03.06.2025 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर कांकाडी ता. जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. दिगांबर विठ्ठल देशमुख 2. गजानन दिगांबर देशमुख 3. प्रल्हाद दिगांबर देशमुख तिघे रा. काकांडी ता. जि. नांदेड यांनी संगणमत करून शेतीचे कारणावरून घरात घुसून लाथबुक्यांनी मारहाण करून डोळयावर दुखापत केली व फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन किंमत 2,84,,000/–रूपयाची हिसकावून घेवून गेले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी संतोष जिवनराव देशमुख, वय 36 वर्षे, व्यवसाय शेती रा. काकांडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 534/2025 कलम 333,119(1),118(1),115(2),352,351(2), 351(3),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2121 पांचाळ, मो.नं. 9788909269** हे करीत आहेत.

# 3)चोरी :–

**1)किनवट :–** दिनांक 04.06.2025 रोजी 13.00 वा. ते 13.30 वा. चे दरम्यान, **एस.टी. बस स्टॅन्ड किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई व तिचा आजोबा असे दोघेजण घरकुलाचा दुसरा हप्ता जमा झाल्याने स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा किनवट येथे येवून रूपये उचलून घेवून पर्समध्ये ठेवून एस.टी. बस स्टॅन्ड किनवट येथे बसमध्ये चढत असताना नगदी 70,000/–रूपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सौ दिव्या बालाजी शिंदे, वय 25 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सिंदगी मोहपूर ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे** किनवट **गुरनं 170/2025** कलम 303(2) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 वाडगुरे, मो. नं. 8805981062** हे करीत आहेत.

## 4)वाहन चोरी :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 03.06.2025 रोजी 17.00 वा. ते 23.00 वा. चे दरम्यान, **नवीन मोंढा नांदेड येथे,** यातील फिर्यादीची टोयोटा इनोव्हा क्रिस्टा गाडी क्रंमाक एम.एच.–26/बी.क्यु.–6332 किंमत 1,70,000/–रूपयाची यातील नमुद आरोपी नामे दिनेश रमेश राठोड वय 25 वर्षे रा. गोविंदनगर, नांदेड याने नविन मोंढा नांदेड येथुन चोरून नेवून किनवट रोड भोकर येथे रोडच्या कडेला पेट्रोलच्या साहयाने जाळुन आगळिक केली. वगैरे **फिर्यादी मंजीत मानसिंग पवार, वय 32 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. नवीन मोंढा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे** शिवाजीनगर **गुरनं 21333/2025** कलम 303(2),326(जी),324(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.नं. 9403546846** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**भाग्यनगर :–** दिनांक 04.06.2025 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **रिझवानी वाईन शॉप बार जवळ नांदेड येथे**, यातील आरोपी नामे 1. सुरेश पवार व इतर चार नाव माहित नाही यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून मी घेतलेली चवळी तु का घेतलास या कारणावरून हातातील लोखंडी पंच, लोखंडी रॉडने पाठीवर,पायावर मारून गंभीर दुखापत करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी संदेश भिमराव पोहरे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती व भाजीपाला विक्री रा. राजेशनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 317/2025 कलम 118(2),118(1),189(2), 191(2),191(3),190,115(2),351(3),352 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/748 कनाके, मो.नं. 9923888322** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड